Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 07 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०७ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रंप यांचं अभिनंदन केलं आहे. भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्यासाठी ट्रंप यांच्याबरोबर पुन्हा काम करण्यासाठी इच्छुक असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून अवैध मद्याची निर्मिती आणि वाहतूक यांवर कठोर कारवाईसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने चार पथकं तयार केली असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक कीर्ती शेंडगें यांनी दिली. ही पथकं महामार्गांवर संशयित वाहनांची तपासणी करतात. तसंच, गोवा राज्यातून रेल्वेद्वारे अवैध मद्याची वाहतूक होऊ नये यासाठी कोकण रेल्वे प्रशासनाशी समन्वय साधून रेल्वे पोलिसांसमवेत प्रवाशांच्या सामानाची अचानक तपासणी करण्यात येत आहे, असंही शेंडगें यांनी सांगितलं.

दरम्यान, आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्य उत्पादन शुल्क विभागाने रत्नागिरी जिल्ह्यात अवैध मद्याविरुद्ध ६६ गुन्हे दाखल केले असून, ५१ आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्यांमध्ये १४०० लिटर गावठी हातभट्टीच्या दारूसह, देशी आणि विदेशी मद्याचा मोठा साठा,२७ हजार लिटर रसायन जप्त करण्यात आलं आहे. तसंच, मद्याची अवैध वाहतूक करणारी वाहनंही ताब्यात घेण्यात आली आहेत. जप्त केलेल्या सर्व मुद्देमालाचं एकूण मूल्य एक कोटी १९ लाख रुपयांहून अधिक असल्याचं शेंडगें यांनी सांगितलं.

****

जळगाव जिल्ह्यात निवडणूक काळात झालेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्यासह जिल्हास्तरीय समितीने निवडणूक लढविणाऱ्या

उमेदवारांच्या जीवीताला असलेल्या धोक्याबाबत तपासणी करून प्रत्येकाला एक शस्त्रधारी अंगरक्षक पुरविण्याचा निर्णय घेतला आहे.यामध्ये ११ मतदारसंघातील ४९ उमेदवारांचा समावेश आहे. ही सुरक्षा केवळ निवडणूक काळासाठी राहणार असून भविष्यात पुन्हा सुरक्षा देण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरीय समिती आवश्यक तो निर्णय घेणार असल्याचं अधीक्षक डॉ. महेश्वर रेडी यांनी सांगितलं.

****

येत्या २० नोव्हेंबरला होणार्या लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दिवशी नांदेड जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमित केले आहेत. हे आठवडी बाजार मतदानाच्या दुसऱ्या दिवशी भरविण्यात यावेत असंही आदेशात सांगण्यात आलं आहे.

****

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आजपासून १५ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्राच्या प्रचार दौर्यावर येत आहेत. या दौर्यात ते युतीच्या उमेदवारांसाठी सभा घेणार आहेत.

****

महाविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे आज अमरावती जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. दर्यापूर,वलगाव आणि बडनेरा या तीन ठिकाणी त्यांच्या सभा होणार आहेत.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं आणखी एका संशयिताला पुण्यातून अटक केली आहे. गौरव अपुणे असं या २३ वर्षीय संशयिताचं नाव आहे. या प्रकरणात आत्तापर्यंत १६ जणांना अटक करण्यात आली आहे.

****

नौदलाच्या खुल्या समुद्रातील नौकानयन 'कोकण रत्न' मोहिमेला आज रत्नागिरीत अल्ट्रा टेक जेट्टी इथं सुरुवात झाली. या मोहिमेला 'हमारा समंदर- हमारी शान' असं नाव देण्यात आलं आहे. समुद्राची स्वच्छता, तस्करी आणि सुरक्षा या विषयावर जनजागृती करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. १० दिवस चालणारी ही मोहीम रत्नागिरीहून बोऱ्यापर्यंत जाणार असून एकूण १२२ सागरी मैलांचं अंतर पार करून परतणार आहे. किनारपट्टीवरील सर्व गावं, सार्वजनिक ठिकाणं आणि शाळांमध्ये कविता, व्याख्यानं आणि नाटकांच्या माध्यमातून सागरी पर्यावरण संवर्धनाबाबत

जनजागृती करण्यात येणार आहे. या संघात एकूण ६० निवडक कॅडेट्सचा समावेश असून महाराष्ट्र एनसीसी युनिटमधून ३१ मुले आणि २९ मुलींचा समावेश आहे.

****

पंचावण्णावा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव येत्या २० तारखेपासून गोव्यात सुरू होणार आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवामध्ये अठरावा फिल्म बाजार २४ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं एका निवेदनात सांगितलं. या वर्षी, व्ह्यूइंग रुममध्ये भारत आणि दक्षिण आशियातील चांगल्या दर्जाच्या चित्रपटांची रेलचेल असेल. चित्रपट निर्मात्यांना जागतिक चित्रपट कार्यक्रम निर्माते,वितरक, विक्री एजंट आणि गुंतवणूकदारांशी इथे थेट संपर्क करता येईल. दक्षिण आशियाई चित्रपटांचा आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय बाजारपेठेत प्रचार करणं हा फिल्म बाजारचा उद्देश आहे.

****

आज राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिन साजरा केला जात आहे.कर्करोगाचा प्रतिबंध, लवकर ओळख आणि उपचार याबद्दल जागरूकता वाढवणे हे या दिनाचे उद्दिष्ट आहे. आज पोलिश-फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ मेरी क्युरी यांची जयंती देखील आहे, या शास्त्रज्ञांच्या रेडियम आणि पोलोनियमच्या महत्त्वपूर्ण शोधांनी कर्करोगाच्या उपचारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

****

दिवाळी सुट्यानंतर नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीचे कामकाज काल पुन्हा सुरु होताच नवीन उन्हाळी कांद्याला ६ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. परतीचा पाऊस आणि दिवाळीच्या सुट्यांमुळे कांदा विक्रीस उशिरा सुरुवात झाल्याने शेतकर्यांना कांदा विक्रीसाठी अडचण निर्माण झाली होती.

***

आदिवासी विकास विभागातील विविध पदांकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आता १२ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती विभागाच्या आयुक्त नयना मुंडे यांनी दिली आहे. विभागाने गेल्या ५ ऑक्टोबर ला विविध पदांकरिता जाहिरात प्रसिद्ध केली होती. यामध्ये अर्ज करण्याची अंतिम मुदत २ नोव्हेंबर होती.

****